कंपनीला १५ वर्षांच्या कालावधीसाठी जाहिरात अधिकार

# मुंबई मेट्रो तीनच्या बाह्य जाहिरातीचा परवाना खासगी कंपनीला



## मुंबईकरांना प्रतिक्षा

भूमिगत मेट्रो प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. यामुळे ३७ हजार कोटींचा मुंबई मेट्रो लाइन ३ प्रकल्प कधीपासून सुरू होणार आहे, त्याची प्रतिक्षा मुंबईकरांना लागली आहे.

## मार्ग ३चे पहिल्या टप्प्याचे काम अंतिम टप्प्यात

मुंबईच्या पहिल्या पूर्णतः भूमिगत मेट्रो मार्ग ३चे पहिल्या टप्प्याचे कामा सध्या अंतिम टप्प्यात आहे. कफ परेड ते आरेपर्यंत २७ स्थानकांद्वारे हा मेट्रो मार्ग जोडला गेला आहे. ही मार्गिका बीकेसी, विमानतळ टर्मिनल १ आणि टर्मिनल २, वरळी, दादर, सिद्धिविनायक, सीएसएमटी, चर्चगेट, हुतात्मा चौक आणि विधान भवन यांसारख्या शहरातील प्रमुख ठिकाणांना जोडण्यात येणार आहे. बाह्य जाहिरातीकरिता निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. ज्यामध्ये सहा कंपन्यांनी सहभाग घेतला. यामध्ये टाइम्स ओओएच ही कंपनी विजेती ठरली.

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने टाइम्स इनोव्हेटिव्ह मीडिया लिमिटेडला १५ वर्षांच्या कालावधीसाठी बाह्य जाहिरातीचा अधिकाराचा परवाना दिला आहे. यामध्ये २७ स्थानके ३१ गाड्या, अन्सिलरी इमारतींमधील एकूण वीस हजार चौरस मीटर जागेसह स्थानकांच्या नाम अधिकारांचाही समावेश आहे.

मुं.मे.रे.कॉ.ने यापूर्वी स्थानक नाम अधिकार, टेलिकॉम इन-बिल्डिंग सोल्यूशन्स, ऑप्टिकल फायबर केबल्सच्या निविदा काढल्या आहेत. सुमारे दीड लाख चौरस फुटांच्या व्यावसायिक जागांच्या परवान्यासाठीच्या निविदा खुल्या करण्यात आल्या आहेत. कंपन्यांकडून त्यास उत्तम प्रतिसाद मिळतो आहे. मुं.मे.रे.कॉने ऑक्टस ॲडव्हायझर्स-स्टुडिओ पीओडी कन्सोर्टियम यांना सर्व मेट्रो-३ च्या नॉन-फेअर बॉक्स द्वारे होणाऱ्या महसूल प्राप्तीसाठी करण्यात येणाऱ्या विविध कामांसाठी सल्लागार म्हणून नेमले आहे.